मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पालखी मार्गावर 1800 मोबाईल टॉयलेटची व्यवस्था

## मोबाईल टॉयलेट ड्रेनेजलाईनच्या चेंबरला जोडणार : चार दिवसांसाठी करणार एक कोटी खर्च

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे गुरुवारी (दि. १९) पिंपरी-चिंचवडमध्ये आगमन होणार आहे. तर, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी शुक्रवारी (दि. २०) पिंपरी-चिंचवड शहरातून जाणार आहे. पालखी मार्गावर महापालिकेतर्फे १ हजार ८०० फिरत्या शौचालयांची (मोबाईल टॉलयेट) व्यवस्था केली जाणार आहे.



> पालखी मार्ग आणि मुक्कामाच्या ठिकाणी व निवास व्यवस्था असलेल्या शाळेच्या आवारात मोबाईल टॉयलेट उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तेथे पुरेसे पाणी व प्रकाशव्यवस्था असणार आहे. सर्व मोबाईल टॉयलेट ड्रेनेजलाईनला जोडण्याचे नियोजन केले आहे. त्यामुळे दुर्गंधीचा प्रश्न निर्माण होणार नाही. महापालिकेच्या निर्मलवारी अंतर्गत स्वच्छतेवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.
>
> **- सचिन पवार, उपायुक्त, आरोग्य विभाग, महापालिका.**

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे गुरुवारी (दि. १९) पिंपरी-चिंचवड शहरात आगमन होणार आहे. त्या दिवशी आकुर्डी येथील विठ्ठल मंदिर येथे पालखीचा मुक्काम असणार आहे, दुसऱ्या दिवशी शुक्रवारी (दि. २०) पालखीचे प्रस्थान होणार आहे. दुपारी दापोडी येथून पालखी सोहळा पुणे शहरात जाणार आहे. त्याच दिवशी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी शहरातून आळंदी रस्ता येथून जाणार आहे. पालखी सोहळा आणि मुक्कामाच्या ठिकाणी महापालिकेच्या वतीने सर्व सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

स्वच्छतेसाठी पालखी मार्ग आणि मुक्कामाच्या ठिकाणी मोबाईल टॉयलेट उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर एकूण १ हजार ४०० मोबाईल टॉयलेट ठेवण्यात येणार आहेत. तर, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर ४०० मोबाईल टॉयलेट उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मोबाईल टॉयलेटमध्ये पाण्याची पुरेशी व्यवस्था असणार आहे. तसेच, प्रकाश व्यवस्था केली जाणार आहे. हे मोबाईल टॉयलेट ड्रेनेजलाईनच्या चेंबरला जोडले जाणार आहेत. त्याची नियमित स्वच्छता केली जाणार आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. पालखी सोहळ्याच्या चार दिवसांसाठी मोबाईल टॉयलेट पुरवण्यासाठी १ कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे.

---

# 76 हजार मालमत्ताधारकांकडे 500 कोटींची थकबाकी

## थकबाकी वसूल करण्यात महापालिका प्रशासनाला अपयश : 434 मालमत्ता अंतिम लिलावाच्या उंबरठ्यावर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने कितीही जनजागृती केली, तरीही थकबाकी असलेले करदाते कर भरण्यास टाळाटाळ करत आहेत. शहरातील ७६ हजार ६८८ मालमत्ताधारकांकडे तब्बल ४९८ कोटींची थकबाकी आहे. त्यामुळे या थकबाकीदार मालमत्ताधारकांना २०२५-२०२६ या आर्थिक वर्षांच्या बिलासोबतच जप्तीपूर्व नोटीस पाठवण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील करसंकलन विभागाकडील ६ लाख ३० हजार २९४ मालमत्ताधारकांपैकी गतवर्षी ५ लाख ०२ हजार ०२८ यांनी कर भरणा केला शहरातील निवासी, औद्योगिक, मोकळे भूखंड, मिश्र मालमत्ताचा महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात आढळलेल्या सुमारे ९२ हजार नवीन मालमत्तांची नोंदणी झाली आहे. या मालमत्तांकडून महापालिका कर वसूल सुरू आहे. नागरिकांना कर भरण्यासाठी ऑनलाइनसह रोखीने कर भरण्याची व्यवस्था करण्यात आली.




> शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा उभारणी, स्वच्छता, रस्ते, पाणीपुरवठा यांसारख्या क्षेत्रात महापालिका सातत्याने काम करत आहे. यासाठी आवश्यक निधीचा एक महत्त्वाचा स्रोत म्हणजे मालमत्ता कर. नागरिकांनी वेळेत कर भरून महापालिकेच्या विकास प्रक्रियेत सहभागी व्हावे. ३० जूनपूर्वी कर भरणाऱ्यांना दिली जाणारी सवलत ही नागरिकांसाठी एक उत्तम संधी आहे.
>
> **- प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, महापालिका.**

२०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये मालमत्ताधारकांना कर भरण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी करसंकलन विभागाने विविध कार्यपध्दती अवलंबली. यामध्ये बिगरनिवासी, औद्योगिक व मिश्र मालमत्तांना जप्तीची कारवाई करण्यात आली. त्यातील ४३४ मालमत्ता अंतिम लिलावाच्या उंबरठ्यावर आहेत. त्यांचा जून २०२५ मध्ये लिलाव करण्यात येणार आहे. शहरातील थकबाकी रहिवासी मालमत्तांचे नळजोडणी खंडित केली. सातबाऱ्यावर बोजा चढवण्याची कारवाई केली. सदनिकाधारकांच्या शेअर सर्टिफिकेटवर थकीत रकमेचा बोजादेखील चढवण्यात आला. थकीत बिगरनिवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र मालमत्तांच्या एकूण १०७२ मालमत्तांवर जप्ती करण्यात आली.

नागरिकांनी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरून किंवा मोबाईल ॲपद्वारे ऑनलाइन कर भरल्यास, सामान्य करात १० टक्के, महिलांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांवर ३० टक्क्यांपर्यंत करसवलत दिली जात आहे. महापालिकेने पर्यावरणपूरक उपक्रम राबवणाऱ्या गृहनिर्माण संस्था, दिव्यांग व्यक्तींच्या नावावर असलेल्या मालमत्ता, तसेच महिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तांना सामान्य करात सवलत देण्याचे धोरण स्वीकारले आहे. ऑनलाइन कर भरण्यास नागरिकांचा प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत ऑनलाईन माध्यमातून १ लाख ८९ हजार ८२३ नागरिकांनी १० टक्के सवलतीचा लाभ घेतला आहे. केवळ ऑनलाईन व्यवहारांमधूनच १८९ कोटी ५२ लाख रुपये जमा झाले आहेत. सहायक आयुक्त अविनाश शिंदे म्हणाले की, थकीत कर न भरल्यास नियमानुसार जप्तीची कारवाई येणार आहे. त्यामुळे थकबाकीदारांनी वेळेत कर भरून महापालिकेला सहकार्य करावे.

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोला आणखी विलंब

## प्रकल्पातील ‘राजभवन’ची जागा सुरक्षेच्या कारणास्तव हस्तांतरित करण्यास नकार

**पुणे | प्रतिनिधी**

‘हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्ग पूर्ण होण्यासाठी आणखी विलंब होणार असून, या प्रकल्पाला मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) दिला आहे. ‘राजभवन’च्या जागेचा ताबा मिळण्यास उशीर झाल्याने येथील कामासाठी विविध विभागांच्या परवानग्या आवश्यक आहेत.

‘पीएमआरडीए’कडून हाती घेण्यात आलेल्या २३.३ किलोमीटर अंतराच्या माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाचे ८५ टक्क्यांपेक्षा जास्त काम पूर्ण झाले आहे. या मार्गावरील पूल बांधण्यात आले असून, लोहमार्ग (रुळ) देखील टाकण्यात आले आहेत. सद्यःस्थितीला २३ स्थानकांवरील सरकते जिने, वाहतूक नियंत्रण दिवे (सिग्नल), विद्युत यंत्रणा आणि इतर किरकोळ दुरुस्तीची कामे अंतिम टप्प्यात असली, तरी या प्रकल्पातील ‘राजभवन’ची जागा सुरक्षेच्या कारणास्तव हस्तांतरित करण्यास नकार देण्यात आला होता.

अखेर फेब्रुवारी महिन्यात ही जागा देण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली. मात्र, ही जागा केवळ नावालाच हस्तांतरित करण्यात आली. या ठिकाणी काम करण्यास सुरक्षेच्या कारणास्तव नकार मिळत असून, परवानग्यांसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. या ठिकाणी स्थानकाचे काम पूर्ण करून मेट्रोची चाचणी याच वर्षी घेण्याचा प्रयत्न असल्याचे ‘पीएमआरडीए’कडून सांगण्यात आले.




### प्रकल्पाला यापूर्वीच उशीर

» हिंजवडी परिसरात असणाऱ्या माहिती तंत्रज्ञान कंपन्या (आयटी पार्क) उद्योगधंदे आणि शिवाजीनगर दरम्यानची वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ‘पीएमआरडीए’ने हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्ग प्रकल्प हाती घेतला. सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) अंतर्गत हा मार्ग विकसित केला जात आहे. भूसंपादन, परवानग्या, निविदा आणि कार्यारंभ आदेश आदींमुळे प्रकल्पाला विलंब झालेला आहे.

“ हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाच्या मार्गादरम्यान येणाऱ्या राज भवनच्या जागेचा ताबा विलंबाने मिळाल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव विविध विभागांच्या परवानग्या रखडल्या आहेत. त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करून चाचणी, तांत्रिक त्रुटींची दुरुस्ती आदी प्रक्रिया पूर्ण करण्यास दहा महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाकडे मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव पाठवला. वित्त विभागाच्या मुख्य सचिवांनी याबाबत बैठक घेऊन मुदतवाढीसाठी सकारात्मकता दर्शवली आहे.

**- रिनाज पठाण, मुख्य अभियंता, पीएमआरडीए.**

# आळंदी, देहूसाठी ‘पीएमपी’च्या जादा बस

## आषाढी पायी वारी सोहळ्यानिमित्त वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रशासनाचे नियोजन

**पुणे | प्रतिनिधी**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या वतीने (पीएमपीएमएल) आळंदी आणि देहू या मार्गांवर जादा विशेष ‘पीएमपी’ सोडण्यात येणार आहे. ‘पीएमपी’ प्रशासनाने याबाबत नियोजन केले असून, वेगवेगळ्या आगारांतून या मार्गांवर बस सोडण्याबाबत वेळापत्रक जाहीर केले आहे.

आषाढी एकादशीनिमित्त श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा देहू येथून बुधवारी (१८ जून), तर श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा आळंदीतून गुरुवारी (१९ जून) पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करणार आहे. या सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या प्रमाणात वारकरी दाखल होत असतात. वारकऱ्यांना देहू आणि आळंदी या ठिकाणी जाण्यासाठी सुलभ सेवा उपलब्ध व्हावी, म्हणून सोमवारपासून (१६ जून) शुक्रवारपर्यंत (२० जून) जादा बस सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पीएमपी प्रशासनाकडून देण्यात आली.

**श्री क्षेत्र आळंदीसाठी बसचे नियोजन**

स्वारगेट, मनपा, हडपसर, पुणे स्टेशन, निगडी, भोसरी, हिंजवडी, चिंचवड आणि पिंपरी आगारातून जादा बस सोडण्यात येईल.

नियमित संचलनातील आणि जादा अशा एकूण १४६ बस दररोज या मार्गांवर धावणार.

१९ जून रोजी रात्री १२ वाजेपर्यंत पीएमपीची सेवा सुरू असणार.

२० जून रोजी पहाटे तीन वाजेपासून स्वारगेट, पुणे स्टेशन, मनपा, हडपसर येथून १६ जादा बस असतील.




**श्री क्षेत्र देहूसाठी बसचे नियोजन**

पुणे स्टेशन, मनपा, निगडी या आगारांमधून बस सोडण्यात येणार.

नियमित संचलनातील आणि जादा बस अशा एकूण ३७ बस दररोज या मार्गावर धावणार.

देहू ते आळंदी मार्गावर एकूण २३ बस सोडण्यात येणार.

पुणे, पिंपरी चिंचवड परिसरातील जवळच्या आगारांमधून नियमित ११३ बस व्यतिरिक्त आळंदीसाठी भोसरी आणि विश्रांतवाडीपर्यंत बस धावणार.

प्रवाशांनी मागणी केल्यास आणखी बस सोडण्याबाबत व्यवस्था. (किमान ४० प्रवाशांची संख्या आवश्यक)

# 30 जूनपर्यंत मालमत्ताकर भरल्यास मिळणार सवलत

## थकीत कर न भरल्यास मात्र नियमानुसार जप्तीची कारवाई होईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी : सहायक आयुक्त अविनाश शिंदे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांनी 30 जूनपूर्वी मालमत्ताकर भरून विविध सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या करसंकलन विभागाने केले आहे. नागरिकांनी ऑनलाइन मालमत्ताकर भरल्यास त्यांना थेट सामान्यकरात 10 टक्के सवलत दिली जाते.

महिलांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांवर 30 टक्क्यांपर्यंत सवलत आहे. पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या हाऊसिंग सोसायटी, संस्था, दिव्यांग व्यक्तींच्या नावावर असलेल्या मालमत्ता, तसेच महिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तांना सामान्यकरात सवलत दिली जाते

दरम्यान, 10 हजार रुपयांपुढील सुमारे 76 हजार 688 मालमत्ताधारांकडे 498 कोटी रुपयांची थकबाकी आहे. या थकबाकीदार मालमत्ताधारकांना महापालिकेच्या वतीने थकबाकी बिलासोबतच जप्तीपूर्व नोटीस पाठविण्यात आली आहे. वेळेवर कर न भरल्यास जप्तीची कारवाई करण्यात येणार असल्याचेही कर संकलन विभागाने स्पष्ट केले आहे.

आतापर्यंत ऑनलाईन माध्यमातून मालमत्ताकर भरणाऱ्या सुमारे 1 लाख 89 हजार 823 नागरिकांनी 10 टक्के सवलतीचा लाभ घेतला आहे. केवळ ऑनलाईन व्यवहारांमधूनच 189 कोटी 52 लाख रुपये जमा झाले आहेत.

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा उभारणी, स्वच्छता, रस्ते, पाणीपुरवठा यांसारख्या क्षेत्रात महापालिका सातत्याने काम करत आहे. यासाठी आवश्यक निधीचा एक महत्त्वाचा स्रोत म्हणजे मालमत्ताकर. नागरिकांनी वेळेत कर भरून महापालिकेच्या विकास प्रक्रियेत सहभागी व्हावे. ऑनलाईन माध्यमातून कर भरल्यास 10 टक्के सवलत, तसेच महिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तांना 30 टक्क्यांपर्यंत सवलत योजना आहे. थकीत कर न भरल्यास मात्र नियमानुसार जप्तीची कारवाई होईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी. असे करसंकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.




### थकीत मालमत्ताकर न भरल्यास जप्ती कारवाई

**» ऑनलाईन माध्यमातून कर भरल्यास 10 टक्के सवलत, तसेच महिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तांना 30 टक्क्यांपर्यंत सवलत योजना आहे. थकीत कर न भरल्यास मात्र नियमानुसार जप्तीची कारवाई होईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे करसंकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.**

### बिल भरून सलवतीचा लाभ घ्यावा

**» शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा उभारणी, स्वच्छता, रस्ते, पाणीपुरवठा यांसारख्या क्षेत्रात महापालिका सातत्याने काम करत आहे. यासाठी आवश्यक निधीचा एक महत्त्वाचा स्रोत म्हणजे मालमत्ताकर. नागरिकांनी वेळेत कर भरून महापालिकेच्या विकास प्रक्रियेत सहभागी व्हावे. तीस जूनपूर्वी कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले आहे.**

### ऑनलाइन माध्यमातून190 कोटींचा कर भरणा

**» आतापर्यंत ऑनलाईन माध्यमातून मालमत्ताकर भरणाऱ्या सुमारे 1 लाख 89 हजार 823 नागरिकांनी 10 टक्के सवलतीचा लाभ घेतला आहे. केवळ ऑनलाईन व्यवहारांमधूनच 189 कोटी 52 लाख रुपये जमा झाले आहेत. ऑनलाइन कर भरणा प्रणालीला प्रतिसाद वाढत आहे.**

# 'रिल्स'चा अतिरेक बेततोय जीवावर; सूचनांना केराची टोपली

## परिसरातील स्थानिक नागरिक, लष्कराचे जवान आणि पोलिसांकडून वारंवार दिल्या जाणाऱ्या सूचना, नियमावली आणि सावधगिरीचा भंग केल्यामुळेच ही दुर्घटना ओढवली

**पिंपरी | प्रतिनिधी**

कुंडमळा येथे पूल कोसळून पर्यटकांचा मृत्यू झाल्याने राज्यभरातून हळहळ व्यक्त होत आहे; मात्र या दुर्घटनेमागे हुल्लडबाजी आणि सोशल मीडियाचा अतिरेक ही गंभीर कारणे समोर आले आहेत.

परिसरातील स्थानिक नागरिक, लष्कराचे जवान आणि पोलिसांकडून वारंवार दिल्या जाणाऱ्या सूचना, नियमावली आणि सावधगिरीचा पुनःपुन्हा भंग केल्यामुळेच ही दुर्घटना ओढवली, असा स्थानिकांचा संतप्त आरोप आहे.

मागील काही वर्षांपासून सोशल मीडियावरील व्हायरल व्हिडिओ, फोटो आणि इंस्टाग्रामवरील रिल्स यामुळे कुंडमळा परिसरात पर्यटकांची गर्दी झपाट्याने वाढली. धबधबे, वेगाने वाहणाऱ्या इंद्रायणी नदीतील खडकांवर उभे राहून 'ॲक्शन रिल्स' बनवणे, पूलाच्या मधोमध उभे राहून पोझ देणे, दुचाकीवरून पुलावरून लाईव्ह जाताना 'स्टोरी' टाकणे हे चित्र सर्रास दिसत होते.

रविवारी झालेल्या दुर्घटनेपूर्वीही अनेक पर्यटक पूल ओलांडत होते. काहींनी दुचाकी थांबवून मोबाईल सेट करून व्हिडिओ रेकॉर्डिंग सुरू केले होते. काहीजणांनी आपल्या मुलांना खांद्यावर घेत 'सेल्फी' घेण्याचा प्रयत्न करत असतानाच पूल कोसळल्याचे स्थानिक सांगतात.

या भागात अनेकदा पोलिसांनी, स्थानिक ग्रामस्थांनी तसेच आपत्ती व्यवस्थापन पथकांनी सूचना फलक लावले होते. पूल जुना आहे, गर्दी करू नका, 'प्रवाह वेगवान आहे, पाणी वाढले आहे,' 'रात्री उशीरापर्यंत थांबू नका', अशा जाहीर सूचना दिल्या होत्या; मात्र पर्यटकांनी या सुचनांकडे दुर्लक्ष केले. काहीजण तर रात्री 11 वाजेपर्यंत देखील या भागात थांबून अश्लील चाळे करत असल्याचे यापूर्वी निदर्शनास आले आहे.




### खा. सुप्रिया सुळे यांनी दिला नातेवाईकांना धीर

**» घटनास्थळी खा. सुप्रिया सुळे येताच दुर्घटनेत बेपत्ता झालेल्यांचे नातेवाईक त्यांना भेटले. माझे जावई आणि नातवाचा अजून शोध लागलेला नाही, त्यांच्याबाबत आम्हांला काही माहिती मिळत नाही, त्यावेळी सुळे यांनी त्यांना धीर देत ते सुखरूप असू शकतात, त्यांना रूग्णालयात दाखल असू शकेल, असे म्हणत धीर दिला.**

### सूचनांना केराची टोपली

**» कुंडमळा पुलाच्या उभारणीला पन्नासहून अधिक वर्षे झाली आहेत. त्याचे बांधकाम जुने असून मधला भाग अजूनही लोखंडीच आहे. पावसाळ्यात नदीला पूर आल्यास हा पूल धोकादायक ठरतो, याची जाणीव प्रशासनाला होती. त्यामुळेच आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि पोलिस विभागाने सूचना फलक लावले होते. तरीदेखील सोशल मीडियावर 'व्हायरल' होण्याच्या नादात दुर्लक्ष केल्याचे दिसून आले.**

# दुधाचे दर घसरले, उत्पादक अडचणीत

## शेतकऱ्याच्या घामाला भाव नाही, गाईच्या दुधाला दर नाही!

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यात दूध उत्पादन हा केवळ व्यवसाय नाही, तर अनेक कुटुंबांचा श्वास आहे. गायी-भाकड जनावरांची सेवा करताना शेतकरी स्वतःच्या लेकरासारखं त्यांचं संगोपन करतो; मात्र याच दुधाला बाजारात न्याय्य दर मिळत नसेल, तर शेतकऱ्यांच्या कष्टांना अर्थ उरत नाही.

मागील काही दिवसांपासून दूध दरात टप्प्याटप्प्याने घसरण सुरू असून, यामुळे पशुपालक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अवकाळी पावसाने आधीच दुभत्या जनावरांच्या आरोग्यावर परिणाम केला होता. त्यानंतर आता दूध पावडर आणि बटरच्या दरात घसरण झाल्याने 25 मेपासून दूध संकलन दरात प्रतिलिटर दोन रुपयांची कपात करण्यात आली आहे.



### बाजारभावाचा घसरता आलेख

» मे महिन्यात पावसाच्या आगमनामुळे आइस्क्रीम, दही, ताक यांची मागणी कमी झाली. परिणामी, दूध प्रकल्पांमध्ये साठा वाढला. त्याचा थेट परिणाम दूध पावडर आणि बटरच्या दरावर झाला दूध पावडर – प्रतिकिलो दरात 30 घसरणबटर – प्रतिकिलो दरात 20 घसरण यामुळे प्रकल्पांनी दर कपात केली असून, पुढे आणखी कपात होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. ही बाजाराची प्रतिक्रिया असली, तरी परिणाम फक्त आणि फक्त शेतकऱ्याच्या ताटात दिसतो.

इंदापूर तालुका हा राज्यात दूध उत्पादनाच्या आघाडीवर आहे. सोनाई, अमूल, दूधगंगा, नेचर, गोविंद आदी प्रकल्पांमार्फत दैनिक लाखो लिटर दूध संकलन होत असले तरी याचा लाभ शेतकऱ्याच्या पदरात कितपत पडतो, हा खरा प्रश्न आहे. सध्या 3. 5 फॅट आणि 8.5 एसएनएफ असलेल्या दुधाला फक्त 32 रुपये प्रति लिटर दर दिला जात आहे. पूर्वी याच दुधाला 34 रुपये दर मिळत होता.

ही केवळ आकड्यांची घसरण नसून शेतकऱ्याच्या तुटत चाललेल्या अपेक्षांची कहाणी आहे. गाईला वेळेवर चारा, पाणी, औषधं, औषधपाणी, झुल देणं, भाकड काळातही सांभाळणं – हे सगळं शेतकरी आईच्या मायेसारखं करत असतो. पण जेव्हा त्याच दुधाला बाजारात नफा देण्याऐवजी तोटा मिळतो, तेव्हा हतबलतेची किनार दूध उत्पादकांच्या बोलण्यात दिसते. शेतकरी आज दर कपातीवर बोलतोय, पण उद्या हा व्यवसाय सोडून देण्याच्या विचारात असेल, तर त्याची जबाबदारी कोणाची? गावागावात जनावरं आहेत, पण त्यांचे रक्षण करणारे शेतकरी जर आर्थिकदृष्ट्या टिकले नाहीत, तर ही साखळी तुटेल आणि तेव्हा उशीर झालेला असेल.

### सरकार कुठे आहे?

» शेतकऱ्यांनी शासनाकडे खालील मागण्या केल्या आहेत
» दूधाला हमीभाव जाहीर करावा
» पशुखाद्यावर अनुदान मिळावे
» साठवणूक करणाऱ्या प्रकल्पांना मदत द्यावी
» बाजार हस्तक्षेप योजना राबवावी
» याशिवाय, दूध उत्पादन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार आहे, हे लक्षात घेऊन दीर्घकालीन योजना राबवण्याची गरज आहे.

### आशेची वाट... की तोट्याचा व्यवहार?

» शेतीच्या अस्थिर उत्पन्नामुळे अनेक तरुणांनी दुग्ध व्यवसायाकडे वळण घेतले. काहींनी कर्ज काढून मुक्त गोठे उभारले, महिलांनी आत्मनिर्भरतेचा मार्ग निवडला. गावोगाव 'दुधात पैसे आहेत' असं म्हणून ही वाट चालायला सुरुवात केली. गाईच्या संगोपनासाठी महिन्याला 15 ते 17 हजार रुपये खर्च येतो – चारा, पशुखाद्य, औषधं, मजुरी, वीज इ. त्यामानाने उत्पन्न फक्त 10 ते 12 हजार रुपयेच.

> “ जनावराला उपाशी ठेवता येत नाही, पण स्वतःचं खिशात काहीच राहत नाही. दूध विकून हातात काहीच उरत नाही. महागडं पशुखाद्य घेऊन गाई जिवंत ठेवायच्या, पण दुधाला दर नाही... मग कसं चालणार?
>
> - बालाजी गवळी, पशुपालक, भाटनिमगाव

---

# आधुनिक शिरूर मॉडेल करणार : आमदार ज्ञानेश्वर कटके

## शिरूर शहराच्या ऐतिहासिक वैभवाला आधुनिकतेची जोड देत आमदार कटके यांनी संकल्पनेतील शिरूर महत्त्वाकांक्षी उपक्रमाची सुरुवात केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर शहराच्या ऐतिहासिक वैभवाला आधुनिकतेची जोड देत आमदार कटके यांनी संकल्पनेतील शिरूर महत्त्वाकांक्षी उपक्रमाची सुरुवात केली आहे. उपक्रमातून शिरूर शहराचा सर्वांगीण विकास साधत सर्व घटकांसाठी एक सुरक्षित, सुसज्ज, सुसंस्कृत आणि आधुनिक सुविधा असलेले मॉडेल शिरूर उभे करण्याचा संकल्प हाती घेण्यात आला आहे, अशी माहिती शिरुर- हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी दिली.

आमदार कटके यांच्या प्रयत्नांतून शिरूर एस. टी. डेपोमध्ये नव्याने पाच एसटी बसेस दाखल झाल्या. बससेवेचा लोकार्पण सोहळा तसेच विविध विकासकामांचा आढावा दौरा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

आमदार कटके यांनी अनेक महिन्यांपासून सुविधेसाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या विनंतीवरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्वरित निर्णय घेतला. आमदार कटके म्हणाले, शासनाच्या सहकार्याने शिरूरसारख्या वाढत्या लोकसंख्येच्या शहराला ही सेवा मिळणे गरजेचे होते. ही सेवा म्हणजे केवळ वाहतूक नाही, तर ग्रामीण जनतेसाठी नवा दुवा आहे.

नियोजित दौऱ्यातून सर्वांगीण विकासाचा आढावा आमदार कटके यांनी शिरूर शहरात व तालुक्यात विविध ठिकाणी भेटी देऊन विकासकामांची प्रगती, नागरिकांच्या अडचणी आणि प्रशासनाच्या भूमिकेचा आढावा घेतला.

नगरपरिषद आढावा बैठक नगरपरिषद कार्यालयात झालेल्या बैठकीत शहरातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, नळपाणी योजना, रस्त्यांचे डागडुजी कामे, सांडपाणी निचरा आदी बाबींवर चर्चा झाली. अधिकारी व पदाधिकाऱ्यांना कामांमध्ये गुणवत्ता आणि वेळेचे पालन करण्याच्या सूचना दिल्या.



कटके म्हणाले की, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल्स आणि आरोग्य केंद्र, अत्याधुनिक वैद्यकीय सेवा टेली-मेडिसिन, आपत्कालीन कक्ष, मातृत्व सेवा यावर भर, स्मार्ट शिक्षण सुविधा आणि शाळा, डिजिटल क्लास रूम्स, अभ्यासिका, कौशल्य विकास केंद्रे, गरजू विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती योजना, हायटेक बस स्थानक, पर्यावरणपूरक बसेस, महिलांसाठी स्वतंत्र बस सुविधा, रस्ते व वीज व्यवस्था, शिरूरचा इतिहास जपणारे संग्रहालय (म्युझियम) आदींचा समावेश आहे. सर्वेक्षण – संवाद- संकल्पना- अंमलबजावणी" या चार टप्प्यांतून हा प्रकल्प राबवला जाणार आहे.

### ३०० कोटींचा निधी आवश्यक

» सर्व संकल्पनांचे रूपांतर प्रत्यक्ष प्रकल्पांत करण्यासाठी आमदार कटके यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला आहे. शासनाकडे जमा असलेली शहरातील १७ एकर जागा पुन्हा शिरूर नगरपरिषदेच्या ताब्यात मिळवण्यास ते यशस्वी ठरले. या उपक्रमासाठी ३०० कोटी निधी लागणार आहे. यापैकी आमदार कटके यांनी शासनाकडून ३६ कोटी रुपयांचा निधी देखील मंजूर करून घेतला आहे

### मॉडेल शिरूरसाठी काम सुरू

» कटके म्हणाले की, आमदार माऊली कटके यांच्या पुढाकारातून शिरूर शहरासाठी एक "संकल्पनेतील शिरूर" मॉडेल शहर घडवण्याचा संकल्प केला आहे. शहराच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचे जतन करत आधुनिक नागरी सुविधांनी समृद्ध अशा शिरूरच्या नव्या रूपाची उभारणी करण्यासाठी आमदार कटके, शिरूर नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत सर्वेक्षण करण्यात आले आहे.